पुढारी
25 NOV 08

## पुण्याची चैताली भंडारी 'हास्यसम्राट'च्या तिसऱ्या फेरीत



कोथरूड (प्रतिनिधी) : पुण्याची चैताली भंडारी (माजगावकर) झी मराठीवरील हास्यसम्राटच्या तिसऱ्या फेरीत दाखल झाली आहे.

चैताली भंडारी मूळची सातारा येथील रहिवासी आहे. घरातील लोकांकडूनच तिला कलेचा वारसा मिळाला. अनेक वक्तृत्व स्पर्धा, सांस्कृतिक कार्यक्रमांतून तिला कलेची आवड निर्माण झाली. त्यानंतर तिने पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्रातून पदवीचे शिक्षण पूर्ण केले आहे. सध्या चैताली पुण्यातील प्लॅनेट फोर्ड कंपनीत विक्री सल्लागार म्हणून काम करत आहे.

# सौ. चैताली भंडारी (माजगावकर) 'हास्यसम्राट'च्या तिसऱ्या फेरीत



सातारा, दि. २ : 'झी मराठी' या वाहिनीवर सुरू असलेल्या आयडिया-हास्यसम्राट या मालिकेमध्ये पुण्याची सौ. चैताली भंडारी (पूर्वाश्रमीची चैताली माजगावकर) हिचा तिसऱ्या फेरीमध्ये प्रवेश झाला आहे.

वडील सुरेंद्र माजगावकर यांच्याकडून तिला मिमिक्री, विनोद, जादू यांचा वारसा मिळाला. याचबरोबर काकांच्या जादूच्या प्रयोगातूनही प्रत्यक्ष अनुभव मिळाला. लहानपणी शाळेच्या तसेच गणेशोत्सव मंडळाच्या माध्यमातून अनेक वक्तृत्व स्पर्धा व फॅन्सी ड्रेस स्पर्धा तिने गाजवल्या आहेत. १२ वी नंतर काहीतरी वेगळं करायचं या इर्षेने तिने पुणे विद्यापीठाच्या ललित कला केंद्र येथून नाट्यशास्त्राची बी. ए. ही पदवी मिळवली. याठिकाणी तिला सतिश आळेकर, विजय केंकरे, ज्योती सुभाष, वामन केंद्रे, शाम वडे, जब्बार पटेल यांच्याकडून मार्गदर्शन मिळाले. संहिता ते प्रयोग यामध्ये तिने 'गोष्ट प्रेमाची' हे नाटक लिहून दिग्दर्शित केले. नंतर अडीच वर्षे मुंबईमध्ये स्ट्रगल करतानाच, सब टी.व्ही.वरील 'बंदा ये बिंदास है' तसेच सह्याद्री वाहिनीवरील 'सारीपाट हा संसाराचा', चोरावर मोर, दामिनी या मालिकांमधून काम करण्यास मिळाले. याचबरोबर वडिलांबरोबर गंमत जंमत हा कार्यक्रम व सूत्रसंचालन/निवेदन कार्यशाळा यांची तिने निर्मिती केली आहे. सध्या ती पुण्याच्या प्लॅनेट फोर्ड या कंपनीत विक्री सल्लागार म्हणूनही कार्यरत आहे. हास्यसम्राटच्या दोन फेऱ्या पूर्ण करताना तिला सुदेश भोसले व मकरंद अनासपुरे यांची वाहवा मिळाली आहे. उरलेल्या सर्व फेऱ्या जिंकून अंतिम फेरीत जाण्याचे तिचे स्वप्न आहे. साताराची ही लेडी हास्यसम्राट निश्चित एक वेगळा ठसा उमटवेल, अशा प्रतिक्रिया व्यक्त होत आहेत.

## सौ. चैताली भंडारी (माजगावकर) हास्यसम्राटच्या तिसऱ्या फेरीत



सातारा (प्रतिनिधी) : झी मराठी वाहिनीवर सुरू असलेल्या 'आयडिया हास्यसम्राट' या मालिकेमध्ये सौ. चैताली भंडारी (माजगावकर) हिला तिसऱ्या राऊंडमध्ये जाण्याचे भाग्य लाभले आहे. सध्या ती पुण्याच्या प्लॅनेट फोर्ड या कंपनीमध्ये विक्री सल्लागार म्हणून कार्यरत आहे.

हास्यसम्राटचे २ राऊंड पार करताना तिला सुदेश भोसले, मकरंद अनासपुरे यांची वाहवा मिळाली. उरलेल्या सर्व फेऱ्या जिंकून अंतिम फेरीत जाण्याचे तिचे स्वप्न आहे.

## चैताली भंडारी 'हास्यसम्राट'मध्ये



सातारा, दि. ३ (प्रतिनिधी) : 'झी' मराठी या वाहिनीवर सुरू असलेल्या 'आयडिया' - 'हास्यसम्राट' या मालिकेमध्ये चैताली भंडारी (पुणे) या तिसऱ्या फेरीत जाण्यास पात्र ठरल्या आहेत.

चैताली भंडारी सध्या पुण्याच्या 'प्लॅनेट फोर्ड' या कंपनीत विक्री सल्लागार म्हणूनही कार्यरत आहेत.

हास्यसम्राटचे दोन फेऱ्या पार करताना त्यांनी सुदेश भोसले, मकरंद अनासपुरे यांची वाहवा मिळवली. उरलेल्या सर्व फेऱ्या जिंकून अंतिम फेरीत जाण्याचे त्यांचे स्वप्न आहे. पूर्वाश्रमीच्या सातारकर असणाऱ्या चैताली यांच्या यशाबद्दल तिचे सातारकरवासीयांकडून अभिनंदन होत आहे. दरम्यान, चैताली यांनी दूरचित्रवाणीवरील 'बंदा ये बिंदास है', 'सारीपाट हा संसाराचा', 'चोरावर मोर' या मालिकांमधून काम केले आहे.